विशेष लेख क्र. ६३ ४ वैशाख १९२९ शके (सायं. ५.३० वा.)

**यशकथा** मंगळवार, दि. २४ एप्रिल, २००७

## महिला बचत गटाद्वारे शांताबाई स्वावलंबी झाल्या

'माय नेम इज शांताबाई, असे शब्द जेव्हा स्टेजवर प्रथमच ऐकावयास मिळाले. तेव्हा सभा मंडपातील सर्वांचेच लक्ष स्टेजवर गेले. बुलढाणा जिल्ह्याच्या देऊळगाव राजा तालुक्यातील देऊळगांव मही येथील सौ.शांताबाई बाबुराव जाधव ही नऊवारी साडीतील डोक्यावर पदर घेतलेली महिला माईक हातात धरुन छानपैकी आपल्या जय भवानी महिला बचत गटाची माहिती राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागातर्फे भरविण्यात आलेल्या बांद्रा येथील **'सरस'** प्रदर्शनात सांगत होत्या. आजची कमी शिकलेली स्त्री ही सुद्धा किती हिमतीने लोकांसमोर बोलते हेच त्यांचे उदाहरण.

शासनाने महिला बचत गटाद्वारे महिलांना एक व्यासपीठच उपलब्ध करुन दिले आहे. १० महिला एकत्र आल्या. त्यांनी जय भवानी महिला बचत गटाची स्थापना केली. ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा बुलढाणा यांनी त्यांना २५ हजार रुपयांचे कर्जही दिले. सौ.जाधव यांनी १० महिलांना एकत्र आणले. मिंटींग घेतली. आधी पंचायत समितीमधील गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांचे मार्गदर्शन घेतले. त्यांची माहिती करुन इतर महिलांनाही महिला बचत गटासंबंधी माहिती करुन दिली आणि येथूनच त्यांचा कार्याला प्रारंभ झाला.

पापड, शेवया कुरडई, वड्या अशा विविध घरगुती खाद्यपदार्थांच्या उत्पादनाची सुरुवात केली. आजही उत्तम प्रकारे त्यांचा महिला बचत गट कार्यरत आहे. सौ.शांताबाई या सातवी पास आहेत. मजुरी करुन कसे तरी जीवन जगायचे हा त्यांचा नित्यक्रम होता. पण महिला बचत गटाने त्यांना उर्जितावस्था प्राप्त करुन दिली. त्या उत्तम गीतकारही आहेत. महिला बचत गटावर त्यांनी एकूण २३ गाणी स्वत:च तयार करुन वेरुळ औरंगाबाद महोत्सवात जनजागृतीचे कार्यक्रम केले. या कार्यक्रमात त्यामध्ये एड्स, दारुबंदी, कुटुंबकल्याण, अल्पबचत, सावित्री बाईंचेशिक्षणाचे कार्य, खादी ग्रामोद्योगाची योजना यांचा समावेश होता.

राज्य शासनाच्या महिला बचत गटाद्वारे आज ग्रामीण भागातील स्त्री घराबाहेर पडली. ती स्वावलंबी झाली आणि तिचे हे स्वावलंबाचे व्रत इतर मैत्रिणींना सांगितले आणि महिला बचत गटाच्या माध्यमातून, ग्रामीण विकासाला एक गती मिळाली. रोजगार मिळाला. नवनवीन गृहोपयोगी वस्तू बाजारात आल्या. वस्तूंची चांगल्या प्रकारे विक्री होऊन दोन पैसे महिलांच्या हातामध्ये खेळू लागले. शांताबाईचे सगळे भाषण ऐकून मन थक्क झाले.

श्रीपाद नांदेडकर

वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

०००